मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# सांडपाणी सिंचन वापरासाठी प्रोत्साहन!

## पिंपरी-चिंचवडमधील विविध प्रकल्पांचे भूमिपूजन व लोकार्पण



**। पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
राज्यात सांडपाणी व मैला- रसायनमिश्रीत दुषित पाणी अत्याधुनिक पद्धतीने प्रक्रिया करुन सिंचनासाठी देण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. नागपूरच्या धर्तीवर मोशी कचरा डेपोवरील लिगसी वेस्टला 'वेल्थ'मध्ये परावर्तीत करण्यासाठी पुढाकार घेणार आहोत. बायोमायनिंगच्या माध्यमातून कचराच्छादित जमीन मोकळी केली जाणार आहे. नदी-नाल्यांचे प्रदुषण रोखण्यासाठी सांडपाणी स्वच्छ करण्याचा प्रयत्न आहे. सांडपाणी थेटपणे नदीत सोडता येणार नाही, असे सरकारचे धोरण आहे, असे मत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने चिखली येथील आरक्षण क्र. १/१६ येथे उभारण्यात आलेल्या नवीन टाऊन हॉलसह तब्बल १ हजार ५० कोटी रुपयांहून अधिक खर्चाची विविध विकासकामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. यावेळी फडणवीस बोलत होते. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, आमदार अश्विनी जगताप, आमदार अण्णा बनसोडे, शहराध्यक्ष शंकर जगताप, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, महापालिका आयुक्त आयुक्त शेखर सिंह, माजी नगरसेवक, पदाधिकारी व महापालिका अधिकारी आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा चिखली ग्रामस्थ व संतपीठा प्रशासनाच्या वतीने तुकोबांची पगडी, मृदंग देवून सन्मान करण्यात आला. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महिलांच्या हातांना काम देण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शक्ती वंदना उपक्रम हाती घेतला. याद्वारे अर्थचक्रामध्ये महिलांचे योगदान घेण्याचा प्रयत्न केला. यासह कौशल्य विकास महत्त्वाचे असून, त्यामुळे रोजगार निर्मितीला मदत होणार आहे. शिक्षण, आरोग्य आणि रोजगारसोबत मनोरंजन-प्रबोधनासाठी सिटी सेंटर उपयोगी ठरेल. शहर चांगले करायचे असेल, तर रस्ते, पाणी आणि अन्य पायाभूत सोयी-सुविधा प्रकल्पांना प्राधान्य दिले जात आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी दोन्ही चाकांनी चांगले काम करीत प्रकल्पांना गती देण्याचे काम केले आहे. तसेच, पिंपरी-चिंचवड शहराची ओळख पुण्याच्या छायेतील शहर असे न राहता. आंतरराष्ट्रीय पातळीवर शहराची स्वतंत्र ओळख निर्माण होण्यासाठी ६ हजारच काय? आणखी हजारो कोटी रुपयांची कामे आमदार महेश लांडगे घेवून आले, तरी आम्ही ती करणार आहोत, असा विश्वासही फडणवीस यांनी दिला. आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, पिंपरी-चिंचवडमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, मैलाशुद्धीकरण प्रकल्प, चिखली टाऊन हॉलचे उद्घाटन, महिला बचत गट सक्षमीकरण 'सक्षमा' प्रकल्प, रोजगार व प्रशिक्षणाच्या 'कौशल्यम' प्रकल्प, नवी दिशा प्रकल्प, १७.९ टन प्रतिदिन क्षमतेच्या जैव वैद्यकीय घनकचरा विल्हेवाट प्रकल्प, राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम छउअझ अंतर्गत प्रकल्प, प्रभाग क्र. ७ भोसरी गावठाणातील स.नं. १ मध्ये कबड्डी प्रशिक्षण केंद्र विकसित करणे, तसेच अनुषंगिक कामाचे उद्घाटन केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पिंपरी-चिंचवड मनपा क्षेत्रात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी चऱ्होली येथील निवासी सदनिकांचे लोकार्पण निगडी येथील जय ट्रेडर्स समोर पादचारी भुयारी मार्गाचे लोकार्पण करण्यात येत आहे.

# आमदार महेश लांडगे यांच्या 'व्हीजन-२०२०'मधील वचनपूर्ती

## शहराच्या लौकीकात भर घालणारी भव्य वास्तू उभारणार



**। पिंपरी-चिंचवड।**
शहरातील पक्षकार आणि वकील बांधवांच्या मागणीनुसार अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले न्यायालय संकुलाचा प्रश्न आता मार्गी लागला आहे. मोशी येथे सर्व सोयी-सुविधांयुक्त न्यायालय संकूल साकारात आहे. ही इमारत शहराच्या लौकीकामध्ये भर घालणारी ठरेल, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे.
पिंपरी-चिंचवड न्यायालय संकुलाच्या भव्य इमारतीचे भूमिपूजन बोऱ्हाडेवाडी, मोशी येथे सर्वोच्च न्यायालयाचे माननीय न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या शुभहस्ते रविवारी करण्यात आले. यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक, न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश देवेंद्रकुमार उपाध्याय, न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे, न्यायमूर्ती संदीप मारणे, न्यायमूर्ती आरिफ सा. डॉक्टर आणि पुणे जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन आदी उपस्थित होते. पिंपरी-चिंचवडचे दिवाणी न्यायाधीश राजेश वानखेडे, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. रामराजे भोसले-पाटील यांच्यासह विधी क्षेत्रातील मान्यवर आणि वकील, विधीतज्ञ यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी पुढाकार घेतला. दि. १ मार्च १९८९ साली पिंपरी-चिंचवड न्यायालयाची स्थापना झाली. मात्र, अद्याप इमारतीचा प्रश्न सुटला नव्हता. आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने 'व्हीजन-२०२०' अभियानांतर्गत न्यायालय संकुलासाठी पाठपुरावा करण्यात आला. आमदार महेश लांडगे म्हणाले की, शहरातील न्यायालयाच्या स्थापनेपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न सोडवण्यासाठी २०१४ पासून आम्ही प्रामाणिकपणे पाठपुरावा केला.
राज्याचे नेते तथा तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, कॅबिनेट मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे शहराच्या लौकिकात भर घालणाऱ्या या भव्य वस्तूची पायाभरणी होत आहे. ही पिंपरी-चिंचवडच्या नावलौकीकात भर घालणारी वास्तू निर्माण होईल.

# मोहननगरमध्ये दीड कोटींचे सिमेंट काँक्रीटचे रस्ते

## खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते भूमीपूजन




**| पिंपरी-चिंचवड |**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या खासदार विकास निधी आणि नगरविकास विभागाच्या माध्यमातून चिंचवड, मोहननगर येथील रस्ते सिमेंट काँक्रीटचे होणार आहेत. एक कोटी ३० लाख रुपयांच्या रस्त्यांच्या कामांचे भूमीपूजन खासदार बारणे यांच्या हस्ते शनिवारी झाले.या भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी माजी नगरसेवक नारायण बहिरवडे, माजी नगरसेवका वैशाली काळभोर, माजी नगरसेवक प्रमोद कुटे, राजूभाऊ दुर्गे, जगदीश शेट्टी, भाजपचे पिंपरी विधानसभा प्रमुख अमित गोरखे, गणेश लंगोटे, युवासेनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव विश्वजित बारणे, युवासेना पश्चिम महाराष्ट्र समन्वयक रुपेश कदम, जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, उपजिल्हाप्रमुख दिलीप पांढरकर, युवासेना जिल्हा प्रमुख राजेंद्र तरस, युवा सेनाशहर प्रमुख माऊली जगताप, उद्योजक रवी नामदे, पिंपरी विधानसभा प्रमुख निखिल येवले, सागर पुंडे, अभिजीत पाटील, संजय जगताप आदी मान्यवर आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते. मोहननगर मध्ये सिमेंट काँक्रीटचे रस्ते करण्याची स्थानिकांची अनेक दिवसांपासून मागणी होती. माजी नगरसेवक प्रमोद कुटे यांनी खासदार बारणे यांच्याकडे पाठपुरावा केला होता. नगरविकास, खासदार स्थानिक निधीतून खासदार बारणे यांनी रस्त्यासाठी निधी मंजुर केला. त्या कामाचे आज भूमीपूजन झाले असून कामाला सुरुवात झाली आहे.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले की, मी जरी आज एका पदावर काम करत असलो. तरी प्रथम मी एक सर्व सामान्य कार्यकर्ता आहे. त्यामुळे जनसेवक या नात्याने जनतेसाठी कामे करणे हे माझे सर्वात महत्वाचे काम समजतो. त्यातूनच प्रत्येक नागरिकाला उत्तम पायाभूत सुविधा मिळाव्यात यासाठी मी प्रयत्न करत असतो. या भागातील नागरिकांनी माझ्यावर प्रेम केले. साथ दिली. मतदान केले. आगामी काळातही माझ्यासोबत राहतील असा मला ठाम विश्वास आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश प्रगती करत आहे. देशाची जगात वेगळी ओळख निर्माण झाली आहे. त्यामुळे तिस-यावेळी मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने, एकदिलाने काम करावे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या यांच्या नेतृत्वाखाली राज्याचा विकासाचा आलेख वाढत आहे. प्रलंबित प्रकल्प मार्गी लागत आहेत. राज्यात अनेत योजना राबविल्या जात आहेत. शहराला भेडसावणारा पाण्याचा प्रश्न पुढील काळात मार्गी लावला जाईल. आगामी काळात नागरिकांच्या मागणीनुसार परिसराच्या विकासासाठी निधी दिला जाईल. निधी कमी पडू दिला जाणार आहे.

# वृक्षमित्र अरुण पवार यांचा ग्रीन महाराष्ट्र परिषदेत गौरव

## पर्यावरणा संदर्भात भरीव कार्य केल्याबद्दल गौरव




**| पिंपरी-चिंचवड |**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
'झाडे लावा, झाडे जगवा,' या संदेशाची प्रभावी अंमलबजावणी करून पर्यावरण संदर्भात भरीव कार्य केल्याबद्दल मराठवाडा जनविकास संघाचे संस्थापक अध्यक्ष वृक्षमित्र अरुण पवार यांचा गौरव करण्यात आला.माईर्स एमआयटी येथे आयोजित ग्रीन महाराष्ट्र परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत वृक्षमित्र अरुण पवार यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी निवृत्त विभागीय आयुक्त दीपक म्हैसकर, निवृत्त सचिव किरण कुरुंदकर, एमआयटी'चे कार्यकारी संचालक राहुल कराड, उद्योजक शिवशंकर लातुरे, मिलिंद पाटील, उद्योजक प्रशांत इथापे, योगेश भोसले, नितीन असालकर, रोहित सरोज, संतोष शिंग,नितीन चिलवंत आदी उपस्थित होते. परिषदेमध्ये अरुण पवार करत असलेल्या वृक्षारोपण, वृक्ष संगोपन या कार्याची दखल घेत कौतुक करण्यात आले. तसेच या कार्यामध्ये सहभाग नोंदवून वृक्ष संवर्धन करण्याचे आश्वासन दिले. दरम्यान, वृक्षमित्र अरुण पवार यांनी घोषणा केली, की दरवर्षीप्रमाणे यंदाही पाऊस पडेपर्यंत झाडांना टँकरच्या माध्यमातून पाणी देऊन झाडांचे संगोपन करण्यात येणार आहे. सध्या भंडारा डोंगर परिसर, इंदोरी परिसर सुदवडी रोड, केशेगाव, बावी,वाडी, बामणी, मोरडा, धारूर अशा सर्व ठिकाणी सात टँकरच्या माध्यमातून झाडांना नियमित पाणी देण्यात येत आहे. जानेवारीपासूनच या कामाला सुरुवात केली आहे. त्यामुळे आम्ही वृक्षारोपण केल्यानंतर पैकी जवळपास सर्वच झाडे आज डौलाने उभी आहेत.माईर्स एमआयटी येथे आयोजित ग्रीन महाराष्ट्र परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत वृक्षमित्र अरुण पवार यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी निवृत्त विभागीय आयुक्त दीपक म्हैसकर, निवृत्त सचिव किरण कुरुंदकर, एमआयटी'चे कार्यकारी संचालक राहुल कराड, उद्योजक शिवशंकर लातुरे, मिलिंद पाटील, उद्योजक प्रशांत इथापे, योगेश भोसले, नितीन असालकर, रोहित सरोज, संतोष शिंग,नितीन चिलवंत आदी उपस्थित होते.

# पीएमपीच्या ताफ्यात लवकरच ५०० गाड्या

## विजेवर धावणाऱ्या ५०० गाड्यांची खरेदी करण्यात येणार

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराची प्रमुख सार्वजनिक सेवा असलेल्या पीएमपीसाठी महापालिकेकडून विजेवर धावणाऱ्या ५०० गाड्यांची खरेदी करण्यात येणार आहे. त्यामुळे पीएमपीच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या वाढणार असून प्रवाशांना जलद सेवा मिळण्यास मदत होणार आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील किमान १० लाख प्रवाशांची पीएमपी ही प्रमुख सार्वजनिक सेवा आहे. त्या तुलनेत पीएमपीच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या अपुरी आहे. त्यामुळे ताफ्यातील गाड्यांची संख्या वाढविण्याची मागणी सातत्याने स्वयंसेवी संस्था, प्रवासी संस्थांकडून होत होती. ही बाब लक्षात घेऊन पुढील वर्षभरात नव्याने ५०० गाड्या खरेदी करण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे.पीएमपी प्रशासनाने गेल्या काही महिन्यांत काही गाड्यांची खरेदी करण्याचा निर्णय घेतला होता. त्याबाबतचा प्रस्ताव संचालक मंडळाच्या बैठकीतही मंजूर झाला असून, गाड्या खरेदीची प्रक्रिया प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. येत्या काही दिवसांत त्या संदर्भातील निविदा प्रक्रिया प्रसिद्ध होणार असून, १७७ गाड्यांची खरेदी पहिल्या टप्प्यात करण्यात येणार आहे. पीएमपीच्या ताफ्यात सध्या विजेवर धावणाऱ्या ४७३ गाड्या आहेत. येत्या काही दिवसांत १७७ गाड्या दाखल होणार असून त्यामुळे ही संख्या ६५० एवढी होणार आहे. त्यामध्ये नव्याने घोषणा केल्याप्रमाणे ५०० गाड्यांची भर पडणार आहे. प्रस्तावित ५०० गाड्यांमध्ये १०० गाड्या विजेवर धावणाऱ्या, तर ४०० गाड्या सीएनजीवरील असतील, असे महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी स्पष्ट केले. रस्ते विकसनाबरोबरच सार्वजनिक वाहतुकीच्या सक्षमीकरणालाही महापालिकेने प्राधान्य दिले आहे. पीएमपीसाठी एकूण ४८२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच पीएमपीच्या सुतारवाडी आणि निगडी या आगारांमध्ये 'बांधा-वापरा आणि हस्तांतरीत करा' या तत्त्वावर आगारांचे व्यापारी विकसन करण्यात येणार आहे. त्यातून पीएमपीला उत्पन्न मिळण्यास मदत होणार आहे. तसेच विविध आगारांमध्ये आणि पीएमपीच्या स्वमालकीच्या मिळकतींवर ई-चार्जिंग स्टेशनही उभारण्याचे नियोजित आहे.चार्जिंगचीही सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होणार आहे.त्यामुळे ताफ्यातील गाड्यांची संख्या वाढविण्याची मागणी सातत्याने स्वयंसेवी संस्था, प्रवासी संस्थांकडून होत होती. ही बाब लक्षात घेऊन पुढील वर्षभरात नव्याने ५०० गाड्या खरेदी करण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे.




### उत्पन्न मिळण्यास मदत होणार

» पीएमपी प्रशासनाने गेल्या काही महिन्यांत काही गाड्यांची खरेदी करण्याचा निर्णय घेतला होता. त्याबाबतचा प्रस्ताव संचालक मंडळाच्या बैठकीतही मंजूर झाला असून, गाड्या खरेदीची प्रक्रिया प्रशासनाकडून सुरु करण्यात आली आहे. येत्या काही दिवसांत त्या संदर्भातील निविदा प्रक्रिया प्रसिद्ध होणार असून, १७७ गाड्यांची खरेदी पहिल्या टप्प्यात करण्यात येणार आहे. पीएमपीच्या ताफ्यात सध्या विजेवर धावणाऱ्या ४७३ गाड्या आहेत. येत्या काही दिवसांत १७७ गाड्या दाखल होणार असून त्यामुळे ही संख्या ६५० एवढी होणार आहे. त्यामध्ये नव्याने घोषणा केल्याप्रमाणे ५०० गाड्यांची भर पडणार आहे. प्रस्तावित ५०० गाड्यांमध्ये १०० गाड्या विजेवर धावणाऱ्या, तर ४०० गाड्या सीएनजीवरील असतील, असे महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी स्पष्ट केले.

# गेल्या वर्षाच्या तुलनेत कांदा उत्पादनात ४७ लाख टनांनी घट?

## प्रवासी वाहतूक क्षेत्रात कार्यरत कंपन्यांकडून विनापरवाना व्यवसाय सुरू

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने २०२३-२४ मध्ये कांदा उत्पादनात गेल्या वर्षाच्या तुलनेत ४७.३५ लाख टनांनी घट होऊन २५४.७३ लाख टन कांदा उत्पादनाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे कांदा निर्यातीवरील निर्बंध उठण्याची शक्यता धूसर झाली आहे.

शेतकरी कल्याण मंत्रालयाने २०२३-२४ या वर्षासाठी फलोत्पादनाचा पहिला अंदाज जाहीर केला. त्यानुसार यंदा देशात सुमारे २५४.७३ लाख टन कांदा उत्पादनाचा अंदाज आहे. सन २०२२-२३मध्ये देशात ३०२.०८ लाख टन कांदा उत्पादन झाले होते. गेल्या वर्षीच्या तुलनेत महाराष्ट्रात ३४.३१ लाख टन, कर्नाटकात ९.९५ लाख टन आणि आंध्र प्रदेशात ३.५४ लाख टन आणि राजस्थानात ३.१२ लाख टनांनी उत्पादनात घट होण्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत कांदा उत्पादनात यंदा ४७.३५ लाख टनांनी घट होण्याचा अंदाज आहे. टोमॅटो उत्पादनात गेल्या वर्षाच्या तुलनेत १.९३ टक्क्यांनी वाढ होऊन एकूण उत्पादन २०८.१९ लाख टनांवर जाण्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षा २०४.२५ लाख टन टोमॅटो उत्पादन झाले होते.देशात यंदा ५८९.९४ लाख टन बटाटा उत्पादनाचा अंदाज आहे. गेल्या वर्षी ६०१.४२ लाख टन बटाटा उत्पादन झाले होते. गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा ११.४८ लाख टनांनी घट होण्याचा अंदाज आहे. कांदा, टोमॅटो आणि बटाटा, ही मुख्य भाजीपाला उत्पादने आहेत. सर्वसामान्यांच्या आहारातील मुख्य घटक असल्यामुळे पुरेशी उपलब्धता आणि दर नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकार या पिकांच्या उत्पादनावर लक्ष ठेवून असते.यंदा देशात एकूण फलोत्पादन (पालेभाज्या, फळभाज्या आणि फळे) ३५५२.५ लाख टनांवर जाण्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षी भाजीपाला लागवड २८४.४ लाख हेक्टरवर होऊन ३५५४.८ लाख टन उत्पादन झाले होते. यंदा २८७.७ लाख हेक्टरवर लागवड होऊन ३५५२.५ लाख टन उत्पादन होण्याचा अंदाज आहे. भाजीपाल्यामध्ये पत्ताकोबी, फूलकोबी, टोमॅटोसह अन्य भाजीपाल्याच्या उत्पादनात वाढ होण्याचा अंदाज आहे. केळी, मोसंबी आणि आंब्याच्या उत्पादनात वाढ होऊन एकूण फळ उत्पादन ११२०.८ लाख टनांवर जाण्याचा अंदाज आहे..



# बेकायदा बांधकाम स्वत:हून काढून घेणार

## छोटा शेख सल्ला दर्गा परिसरातील अतिक्रमण प्रकरण

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** कसबा पेठेमध्ये असलेल्या छोटा शेख सल्ला दर्ग्याच्या परिसरातील बेकायदा बांधकाम स्वत:हून काढून घेण्याचा निर्णय दर्ग्याच्या विश्वस्तांनी शनिवारी (ता. ९) जाहीर केला. पोलिस आयुक्तालयात शनिवारी पार पडलेल्या बैठकीत हा निर्णय विश्वस्तांनी घेतला. महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, पोलिस आयुक्त अमितेश कुमार, दर्ग्याचे विश्वस्त बैठकीस उपस्थित होते. कसबा पेठेतील पुण्येश्वर मंदिराजवळ छोटा शेख सल्ला दर्गा परिसरातील बेकायदा बांधकामावर कारवाई केली जाणार असल्याची अफवा शुक्रवारी रात्री पसरली. त्यानंतर दर्ग्याच्या परिसरात मोठा जमाव जमला होता. परिसरात घोषणाबाजी करण्यात आल्याने तणाव निर्माण झाला. या परिसरात कायमस्वरूपी बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.




जमाव जमल्यानंतर तातडीने पोलिसांनी जादा कुमक मागवून घेतली. पोलिस आयुक्त अमितेश कुमार, अतिरिक्त आयुक्त प्रवीणकुमार पाटील, उपायुक्त संदीपसिंग गिल यांनी घटनास्थळी भेट दिली. जमावाला शांत राहण्याचे आवाहन करण्यात आले. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेऊ नये, असे आवाहन पोलिस आयुक्तांनी केले. कारवाई केली जाणार नसल्याचे पोलिसांनी सांगितल्यानंतर जमाव परतला. त्यानंतर शनिवारी पोलिस आयुक्तालयात बैठक पार पडली. त्यात दर्ग्याच्या परिसरातील बेकायदा बांधकाम स्वत: हून काढून घेतले जाईल, असा निर्णय दर्ग्याच्या विश्वस्तांकडून जाहीर करण्यात आला. दर्ग्याच्या परिसरातील नवीन मशिद मान्य नकाशाप्रमाणे करण्यात येणार आहे. या भागात करण्यात आलेले बेकायदा वीट बांधकाम, दरवाजे, खिडक्या प्रशासनाशी चर्चा केल्यानंतर स्वत:हून काढण्यात येणार आहे, असे विश्वस्तांनी जाहीर केले. छोटा शेख सल्ला दर्गा, तसेच मूळ बांधकामाला कोणीतीही हानी पोचणार नाही. १९२७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार (गॅझेट) जुन्या मशिदीला कोणतीही हानी पोचणार नाही. ३० मार्च २०१९ रोजी महापालिकेने काम थांबविण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर या परिसरातील नवीन मशिदीतील बेकायदा झालेले वाढीव बांधकाम स्वत:हून काढून घेण्यात येणार आहे, असे बैठकीत ठरले आहे.न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार प्रशासन काम करेल. बांधकामाच्या परवानगीबाबत अर्ज आल्यानंतर नियमानुसार प्रशासनाकडून सकारात्मक विचार करण्यात येईल. विश्वस्तांनी विनंती केल्यास कायदेशीर अस्तित्वात असलेल्या बांधकामाच्या नूतनीकरणासाठी सामाजिक दायित्व निधीतून (सीएसआर) महापालिका प्रशासन सर्वपोतरी मदत करेल, असे महापालिका अधिकाऱ्यांनी बैठकीत सांगितले.दर्ग्याच्या परिसरात अनधिकृत बांधकाम काढून घेण्यासाठी महानगरपालिकेने ट्रस्टला २२ फेब्रुवारीला नोटीस बजावली होती. अतिक्रमण काढण्यासाठी सात दिवसांनी मुदत देण्यात आली होती. मात्र मुदतीत अतिक्रमण न काढल्याने महापालिकेने कारवाईची तयार सुरू केली आहे. त्यासाठी सात जेसीबी व सुमारे २० डंपरची व्यवस्था टिळक पुलाजवळ करून ठेवण्यात आली होती. गेल्या चार दिवसांपासून महानगरपालिकेत गोपनीय पद्धतीने याचे नियोजन सुरू होते.

### नूतनीकरणाला मदत करणार : महानगरपालिका

**» न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार प्रशासन काम करेल. बांधकामाच्या परवानगीबाबत अर्ज आल्यानंतर नियमानुसार प्रशासनाकडून सकारात्मक विचार करण्यात येईल. विश्वस्तांनी विनंती केल्यास कायदेशीर अस्तित्वात असलेल्या बांधकामाच्या नूतनीकरणासाठी सामाजिक दायित्व निधीतून (सीएसआर) महापालिका प्रशासन सर्वपोतरी मदत करेल, असे महापालिका अधिकाऱ्यांनी बैठकीत सांगितले. दर्ग्याच्या परिसरातील नवीन मशीद मान्य नकाशाप्रमाणे करण्यात येणार आहे. या भागात करण्यात आलेले बेकायदा वीट बांधकाम, दरवाजे, खिडक्या प्रशासनाशी चर्चा केल्यानंतर स्वत:हून काढण्यात येणार आहे, असे विश्वस्तांनी जाहीर केले. छोटा शेख सल्ला दर्गा, तसेच मूळ बांधकामाला कोणीतीही हानी पोचणार नाही.**

# गावांच्या सर्वांगीण विकासासाठी ५५० कोटींची तरतूद

## गावांसाठीची आर्थिक तरतूद राष्ट्रवादी काँग्रेसच्या फायद्याची?

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांच्या सर्वांगीण विकासासाठी ५५० कोटींची तरतूद महापालिकेने केली आहे. समाविष्ट गावांपैकी काही गावे शिरूर आणि बारामती लोकसभा मतदारसंघात येत असल्याने आगामी लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला त्याचा राजकीय लाभ होण्याची शक्यता आहे. महापालिका हद्दीमध्ये ऑक्टोबर २०१७ मध्ये ११ आणि त्यानंतर जुलै २०२१ मध्ये २३ गावे अशा एकूण ३४ गावांचा समावेश करण्यात आला आहे. या गावांमध्ये पायाभूत सुविधा तातडीने दिल्या जातील, असे महापालिकेकडून सांगण्यात आले होते. मात्र रस्ते, सांडपाणी वाहिन्या, पाणीपुरवठा, वीज अशा पायाभूत सुविधा



उपलब्ध करून देण्यास महापालिकेतील तत्कालीन सत्ताधारी भारतीय जनता पक्षाला अपयश आले होते. त्यातच महापालिकेने येथील मिळकतींना तिप्पट दराने मिळकतकर आकारणी केली आहे. त्या विरोधातही स्थानिकांमध्ये असंतोष आहे. त्यामुळे या गावातील नागरिकांना दिलासा देण्याचा महापालिकेचा प्रयत्न राष्ट्रवादी काँग्रेसच्या पथ्यावर पडण्याची शक्यता आहे. समाविष्ट गावांपैकी बहुतांश गावे शिरूर आणि बारामती लोकसभा मतदारसंघात येत आहेत. या दोन्ही मतदारसंघांवर राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व आहे. मिळकतकराच्या तिप्पट आकारणीबाबत आणि थकबाकी वसुलीसंदर्भात गावकऱ्यांचे शिष्टमंडळ उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भेटले होते. आगामी निवडणूक लक्षात घेऊन तिप्पट मिळकतकर आकारणीस आणि थकबाकी वसुली करण्यास धोरणात्मक निर्णय होईपर्यंत पवार यांनी स्थगिती दिली होती. तशी सूचना त्यांनी महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांना केली होती. त्यातच आता रस्ते, पाणी, वीज, सांडपाणी, आरोग्य अशा विविध पायाभूत सुविधांसाठी ५५० कोटींची तरतूद महापालिकेने केली आहे.